RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ८९(६)] गुरुवार, जून ११, २०२६/ज्येष्ठ २१, शके १९४८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३२९**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ जून २०२६.

**आदेश**

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम.**

क्रमांक मुद्रांक-२०२६/प्र.क्र.०२/मुद्रांक-२.— महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम (१९५८ चा ६०) (यात यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ९ च्या खंड (अ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, जनहितार्थ तसे करणे आवश्यक असल्याची खात्री पटल्याने, याद्वारे, अतिउच्चदाब व उच्चदाब उपसा जलसिंचन योजनांकरिता असलेल्या सौरऊर्जीकरण योजनेअंतर्गत प्रस्थापित केलेला सौर ऊर्जा प्रकल्पाच्या बाबतीत, विकास व उप-विकास करारांवर आणि भाडेपट्टा व पोट-भाडेपट्टा करारांवर, उक्त अधिनियमास जोडलेल्या अनुसूची-एकच्या अनुच्छेद ५ (ग-अ) व अनुच्छेद ३६ अन्वये आकारण्यायोग्य असलेले मुद्रांक शुल्क, पुढील शर्तीस अधीन राहून, माफ करीत आहेः—

**शर्ती.-**

(१) या आदेशान्वये मुद्रांक शुल्क कपात केल्याचा किंवा माफ केल्याचा लाभ मिळवणारा कोणताही लाभार्थी, इतर कोणत्याही आदेशान्वये किंवा धोरणान्वये, इतर कोणतीही सवलत किंवा सूटसाठी हक्कदार असणार नाही.

(२) हा आदेश, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध करण्यापूर्वी आधीच मुद्रांक शुल्क प्रदान करण्यात आलेले असेल त्या बाबतीत, कोणताही परतावा देण्यात येणार नाही.

(३) ही कपात, सौरऊर्जीकरणाशी संबंधित करारांनाच केवळ लागू होईल.

(४) या आदेशान्वये, इतर प्रकारचा करार, कपातीसाठी पात्र असणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सत्यनारायण बजाज,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mumbai 400 032,

dated 11th June 2026.

### Order

MAHARASHTRA STAMP ACT.

No.Mudrank-2026/C.R.02/Mudrank-2.— In exercise of the powers conferred by clause (*a*) of section 9 of the Maharashtra Stamp Act (LX of 1958) (hereinafter referred to as "the said act"), the Government of Maharashtra, being satisfied that it is necessary to do so in the public interest, hereby remits the stamp duty chargeable under the Article 5 (g-a) and Article 36 of Schedule-I appended to the said Act, on the Development and Sub-Development Agreements and lease and sub-lease agreements related to the Solar Energy Project established under the Solarisation Scheme for the Ultra high pressure and high pressure lift irrigation schemes, subject to the following conditions namely:—

*Conditions*:-

(1) Any beneficiary availing the benefit of reduced or waived stamp duty under this order shall not be entitled to any other concession or exemption under any other order or policy.

(2) No refund shall be granted for stamp duty paid prior to the publication of this order in the *Maharashtra Government Gazette*.

(3) The reduction shall apply only to agreements related to solarisation.

(4) No other type of agreement shall be eligible for reduction under this order.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATYANARAYAN BAJAJ,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.